# अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन मुंबई यांचे कार्यालय

एस.आर.अे.बिल्डींग, अे-विंग, दुसरा मजला, अनंत काणेकर मार्ग, बांद्रा(पू), मुंबई-४०० ०५१.
कार्यालय फोन व फॅक्स क्र: ०२२-२६५९१५८६, E-mail: dcfmangrovecell@gmail.com


**विषय**:- कोकण पाणथळ तक्रार निवारण समितीच्या बैठकीचे मंजूर इतिवृत्त.

जा.क्र.कक्ष-१/ल.ले/ ७८ /सन २०१८-१९
बांद्रा, मुंबई ४०० ०५१ दिनांक: ११/०९/२०१८.

**प्रति,**

१. विभागीय आयुक्त, कोकण विभाग, नवी मुंबई.
२. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई.
३. जिल्हाधिकारी, मुंबई/ मुंबई उपनगर/ ठाणे/ पालघर / रायगड / रत्नागिरी / सिंधुदुर्ग.
४. पोलिस आयुक्त, मुंबई/ठाणे यांचे प्रतिनिधी.
संबंधित जिल्हा पोलीस अधिक्षक, [ठाणे (ग्रामीण) /पालघर/ रायगड/ रत्नागिरी/ सिंधुदुर्ग]
५. संचालक, पर्यावरण विभाग.
६. अपर आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, कोकण विभाग.
७. महानगर पालिका आयुक्त / सह आयुक्त (मुंबई / नवी मुंबई / ठाणे / मिरा भाईंदर/ वसई-विरार / कल्याण-डोंबविली / भिवंडी निझामपुर / उल्हासनगर.)
८. श्री. दयानंद स्टॅलिन, संचालक, वनशक्ती अशासकीय संस्था.
९. प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ.
१०. नगर रचना विभागाचे अधिकारी / CIDCO यांचे प्रतिनिधी.
११. डॉ. महेश शिंदीकर, Applied dept of Science, College of Engineering Pune.

उपरोक्त विषयान्वये कोकण विभागातील वेटलँड संदर्भात पाणथळ तक्रार निवारण समितीची **१७** वी बैठक दिनांक **३१/०७/२०१८** रोजी मा. विभागीय आयुक्त कोकण विभाग यांचे कार्यालय, कोकण भवन, सी.बी.डी बेलापूर, नवी मुंबई येथे घेण्यात आली सदर बैठकीचे मंजूर इतिवृत्त माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी सादर करण्यात येत आहे.

सदस्य सचिव,
कोकण पाणथळ तक्रार निवारण समिती
तथा
उपवनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई.

## कोकण विभागातील वेटलँन्ड संदर्भात पाणथळ तक्रार समितीची १७ वी मासिक बैठक दि.३१/०७/२०१८ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त.

| अ.क्र | मुद्दा | करावयाची कार्यवाही | अंमलबजावणी करणारी यंत्रणा |
|---|---|---|---|
| १ | a) श्री. कुलदिप चौधरी (मौजे नायगाव जि. पालघर )<br>b) श्री. अनिकेत स. वाडीवकर (आगाशी ता. वसई जि. पालघर)<br>c) श्री. मॅकेन्झी डांबरे (भुईगांव, वसई जि. पालघर)<br>d) श्री. स्टॅलिन डी (आगाशी ता. वसई जि. पालघर) | समितीने सदर जागेचे Restoration करुन जागेवर केलेल्या कार्यवाहीचा अहवाल,छायाचित्रे आणि संबंधित सर्व कागदपत्रे सादर करण्याबाबत दि. २०.०६.२०१८ रोजीच्या बैठकीत सांगितले होते.<br>• या संदर्भात तहसिलदार वसई यांनी सदर जागेवरुन जूने डेब्रिज हटवुन तेथे भराव करण्याचे काम बाकी असून ते पावसाळा संपल्यानंतर पुर्ण करु असे समितीला सांगितले. | जिल्हाधिकारी, पालघर |
| २ | अज्ञात व्यक्ती - **KW2**<br>Lots of trucks dumpers dumping the red clay in Mangrove. (स्थळ:- सेक्टर-२३ घनसोली, नवी मुंबई ) | • या तक्रारी संदर्भात सिडको यांच्या प्रतिनिधींनी सदर जागेवरील डेब्रीज हटविण्याचे काम दि.२०.०६.२०१८ रोजी पूर्ण झाले असल्याचे सांगितले होते परंतु सदरचा अहवाल अद्याप प्राप्त झालेला नाही.<br>• त्यामुळे समितीने सिडको यांच्या प्रतिनिधींना सदर समितीच्या बैठक या मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार घेतल्या जात असल्याने या समितीवर गांभीर्यपूर्वक विचार करुन या तक्रारीबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्याचे आदेश दिले व या तक्रारीबाबतचा अहवाल पुढील बैठकीत प्राधान्याने सादर करण्यास सांगितले. | सिडको |
| ३ | श्रीमती श्वेता भट दि.०६.०२.२०१८<br>Destruction of mangrove behind Hiranandani, Kavesar, Thane. | १) या तक्रारी संदर्भात ठाणे महानगरपालिकेच्या प्रतिनिधींनी त्यांच्या दि.३०.०७.२०१८ रोजीच्या अहवालानुसार दि.२६/०६/२०१८ रोजी सकाळी ११.०० वाजता तहसिलदार, कांदळवन कक्ष व तक्रारदार यांच्या सोबत हिरानंदानी इस्टेट परिसरातील टी.सी.एस संकुलाच्या मागील भागातील एकूण तीन ठिकाणांची स्थळ पहाणी करण्यात आली असे सांगितले.<br>२) समितीने तहसिलदार ठाणे, वनपरिक्षेत्र अधिकार, मुंबई कांदळवन संधारण घटक आणि तक्रारदार यांच्या सोबत एकत्र स्थळपहाणी केलेला पंचनामा तहसिलदार ठाणे यांना संपुर्ण माहिती व छायाचित्रासहीत अहवाल पुढील बैठकीमध्ये सादर करण्यास सांगितले. | महानगरपालिका ठाणे<br>आणि<br>तहसिलदार ठाणे |
| ४ | तकारदार श्री. स्टॅलिन डी<br>प्राप्त दि.१५.०२.२०१८<br>विषय :- Illegal dumping on wetlands along JVLR and Eastern express highway (स्थळ :- जोगेश्वरी विक्रोळी रोड, मुंबई) | १) श्री. स्टॅलिन यांनी JVLR ला लागून असलेले जे दोन गेट आहेत ते बंद करण्याबाबत सांगितले जेणेकरुन त्या ठिकाणी डेब्रिज पुन्हा जमा होणार नाही. त्यानुसार समितीने मुंबई महानगरपालिका यांना सदर जागेवरील गेट बंद करण्याबाबतच्या सूचना दिल्या होत्या.<br>• त्यानुसार समितीने BMC यांना मागील बैठकीत दिलेल्या आदेशाचे पालन करण्यास सांगितले. | मुंबई महानगरपालिका उपविभागीय अधिकारी, पुर्व मुंबई उपनगर, पोलीस आणि MPCB. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | २) समितीने उपविभागीय अधिकारी यांना subsection (1) of section 15 of EPA, 1986 अंतर्गत तक्रार / FIR नोंदविण्याचे निर्देश दिले सदर तक्रारीच्या आधारावर पोलिसांना तपासणी करुन आरोप पत्र (Chargesheet) जमा केलेल्या कागदपत्रांसह एमपीसीबीकडे हस्तांतरित करावे व त्यानंतर MPCB यांनी तक्रार मा.न्यायालयात दाखल करावी असे सांगितले. | |

**Procedure for Prosection of offence under EPA, 1986**

A) Th committee headed by the Divisional Commissioner, Konkan Division has laid down following procedure to file complaints under EPA, 1986 as per the directives of Honourable Bombay High Court order dated Dec 22, 2016 (PIL 218/2013).

**Case I :-**

| |
|---|
| Authorised officer under clause (a) of Section 19, Environment Protection Act, 1986 |
| ↓ |
| Registration of complaint before police |
| ↓ |
| Investigation by Police |
| ↓ |
| Transfer of complaint / charge sheet including all materials collected during investigation to MPCB (Maharashtra Pollution Control Board) |
| ↓ |
| Regional Officer, MPCB will file the complaint before Honourable Court |

**Case II :-**

| |
|---|
| Registration of offences by the Police (FIR) |
| ↓ |
| Investigation by police |
| ↓ |
| Transfer of charge sheet including all materials collected during investigation to MPCB (Maharashtra pollution Control Board) |
| ↓ |
| Regional officer, MPCB will file the complaint before Honourable Court |

B) Authorized officers [Collector, SDO and MPCB] will properly co-ordinate with concerned police officer during investigation and filing of complaint.

C) Filing of complaint within two months.

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | श्री. धिरज परब - भाईंदर पश्चिम, येथे मुर्धा रेव आगार भागात सरकारी जागेत नैसर्गिक पाळथळाचा ऱ्हास झाल्याबाबत. स्थळ :- भाईंदर प, जि.ठाणे. | १) या तक्रारी संदर्भात उपआयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका यांनी त्यांच्या पत्र क्र.मनपा/अवि/ १७९/२०१८-१९,दि.१९.०६.२०१८ रोजी अहवाल सादर केला.<br>• सदरच्या अहवालानुसार श्री स्टॅलिन आणि मुर्धा रेवा आगार येथील पत्राशेड असलेले ३६ कच्चे बांधकाम व प्लॅस्टीक कपडयाच्या सहाय्याने ८ कच्ची बांधकामे दि.४.०६.२०१८ रोजी तलाठी समवेत पोलीस बंदोबस्तात जे.सी.बीच्या सहाय्याने कार्यवाही करण्यात आली आहे असे सांगण्यात आले.<br>२)समितीने सदरचा अहवाल सर्व सदस्यांना पाठविण्यात यावा असे सांगितले व त्या अनुषंगाने या अहवालाबद्दल कोणाला विरोध असल्यास त्यांनी याबाबत पुढील बैठकीमध्ये माहिती द्यावी. | आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका |
| ६ | श्री. धिरज परब :-<br>भाईंदर पश्चिम राधा स्वामी सत्संग व परिसरात पाणथळ, कांदळवनाच्या ऱ्हासाबाबत. | १) या तक्रारी संदर्भात उप-आयुक्त मिरा-भाईंदर महानगरपालिका यांनी या तक्रारी संदर्भात पत्र क्र. मनपा/अवि/२६७/२०१८-१९, दि.३१/०७/२०१८ रोजी लेखी अहवाल समितीपुढे सादर केला.<br>• सदरच्या जागेबाबत मिठ अधिक्षक श्री. अग्रवाल यांचे सोबत संपर्क साधला असता सदर बाबत सॉल्ट विभाग व विकासक यांच्या मध्ये जमिनीच्या मालकी हक्काबाबत न्यायालयात दावा दाखल असल्याबाबत सांगितले त्यानुसार मिठ अधिक्षक - सॉल्ट विभाग, तलाठी, महसूल विभाग व मनपा यांचे सर्वेक्षण करुन पुढील कार्यवाही प्रस्तावीत आहे.<br>• राधा स्वामी सत्संग येथे केलेला माती भराव काढून टाकणे व खाडीचे येणारे पाणी बंद केलेले आहे ते पुर्ववत चालू करणे व ऱ्हास झालेल्या कांदळवनाची लागवड करण्यात यावी याबाबत राधा स्वामी सत्संग यांना जा. क्र. मनपा / अवि / ८८ / २०१८ / १९ दि.२६/०४/२०१८ अन्वये कळविण्यात आलेले आहे. त्याअनुषंगाने त्यांनी स्वत:हून नाल्याशेजारी असलेला माती भराव काढून टाकलेला आहे असे मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या प्रतिनीधींनी सांगितले.<br>२) समितीने सदरचा अहवाल सर्व सदस्यांना पाठविण्यात यावा असे सांगितले व त्या अनुषंगाने या अहवालाबद्दल कोणाला विरोध असल्यास त्यांनी याबाबत पुढील बैठकीमध्ये माहिती द्यावी असे सांगितले. | मिरा-भाईंदर महानगरपालिका |
| ७ | श्री. धिरज परब -मीरा भाईंदर महापालिकेने आरक्षण क्र. १२२ डी दफनभूमी प्रकरणी MCZMA ची तद्यन फसवणूक व दिशाभूल करुन घेतलेली मंजूरी रद्द करणे. | १) या तक्रारी संदर्भात उप-आयुक्त मिरा-भाईंदर महानगरपालिका यांनी या तक्रारी संदर्भात पत्र क्र.मनपा/अवि/२६८/२०१८-१९, दि.३१.०७.२०१८ रोजी समितीपुढे सादर केला.<br>• सदर अहवालामध्ये मिराभाईंदर महानगर पालिकेची | आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका |

| | | | |
|---|---|---|---|
| | | विकास योजना शासनाने दि. १४.०५. १९९७ रोजी मंजूर केली आहे.<br>सदर विकास योजनेत मौजे नवघर येथेआरक्षण क्र. १२२ डी दफनभूमी येथे राखीव आहे.<br>▪ सदर आरक्षीत जागेचे क्षेत्र ४४६१६.०० चौ.मी एवढे आहे.<br>▪ त्यापैकी ३३२२९.०० चौ.मी क्षेत्रावर कांदळवन आहे.<br>▪ उर्वरित ११३९५.०० चौ.मी क्षेत्रापैकी ३४२०.०० चौ.मी. क्षेत्रावर झोपडया आहेत.<br>सदर झोपडया धारक सन २००३ पासून आरक्षण क्र. १२२ डी या दफनभूमीच्या जागेवर आहे.<br>• दि. १.०३.२०१८ रोजीच्या आदेशाने जिल्हाधिकारी ठाणे यांनी सदर दफनभूमीच्या एकूण जागेपैकी ३ हेक्टर जागा आरक्षणाच्या विकासासाठी मिरा-भाईंदर महानगरपालिकेकडे वर्ग केलेली आहे.<br>• दि. ०५.०१.२०१३ रोजी झालेल्या महाराष्ट्र सागरी किनारा क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरण यांच्या बैठकीत सदर दफनभूमीच्या जागेचे संरक्षण करण्यासाठी तोरेचे कूंपण घालून जागा समतल करण्यास परवानगी दिली होती.<br>• इतर कोणतीही नवीन कामे सदर जागेवर करण्यात आलेली नाहीत असे मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या प्रतिनीधींनी सांगितले.<br>२) सदर अहवालात MCZMA यांच्या अंतर्गत झालेल्या दि.०५.०१.२०१३ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त सादर केले.<br>• सदर इतिवृत्तात दुरूस्ती व नूतनीकरणाच्या कामामध्ये कोणत्याही कांदळवनाची कत्तल केली जाणार नाही आणि ५० मीटरचे बफर झोन काटेकोरपणे कांदळवन क्षेत्रासाठी ठेवण्यात यावे असे नमूद केले आहे. सदर मुद्याबाबत समितीने उप आयुक्त मिरा-भाईंदर महानगरपालिकेस स्पष्टीकरण अहवाल पुढील बैठकीमध्ये देण्यास सांगितले. | |
| ८ | श्री. सुनिल अगरवाल<br>Complete Destruction of Wetlands and Mangroves in Sector 14 of Kharghar. | १) समितीने दि. २०.०६.२०१८ राजीच्या बैठकीत सदर जागेची स्थळ पहाणी करुन आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या सूचना सिडको यांच्या उपस्थित प्रतिनिधींना देऊन त्याबाबतचा अहवाल पुढील बैठकीमध्ये सादर करण्याबाबत सांगितले होते.<br>• दि.३१/०७/२०१८ रोजीच्या बैठकीत सिडको यांच्या प्रतिनीधीना या तक्रारी बाबत विचारणा केली असता सदर तक्रारी बाबत अजून कोणतीही कार्यवाही न झाल्याचे निदर्शनास आल्याने कोकण पाणथळ तक्रार निवारण समितीच्या तक्रारींबाबत सिडको गांभीर्याने लक्ष देत | सिडको आणि जिल्हाधिकारी रायगड |

<table>
<tr><td></td><td></td><td>नसल्याचे समितीच्या लक्षात आले.<br>२) त्यामुळे समितीने सिडको यांच्या प्रतिनिधींना सदर समितीच्या बैठका मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार घेतल्या जात असल्याने या समितीवर गांभीर्यपूर्वक विचार करुन या तक्रारीबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्याचे आदेश दिले व या तक्रारीबाबतचा अहवाल पुढील बैठकीत प्राधान्याने सादर करण्यास सांगितले.</td><td></td></tr>
<tr><td>९</td><td>श्री. स्टॅलिन डी व श्री. रोहीत जोशी<br>Improper investigation and filling or FIR</td><td>समितीने उपविभागीय अधिकारी यांना subsection (1) of section 15 of EPA, 1986 अंतर्गत तक्रार / FIR नोंदविण्याचे निर्देश दिले सदर तक्रारीच्या आधारावर पोलिसांना तपासणी करुन आरोप पत्र (Chargesheet) गोळा केलेल्या सामग्रीसह एमपीसीबीकडे हस्तांतरित करावे व त्यानंतर MPCB यांनी तक्रार मा. उच्च न्यायालयात दाखल करावी असे सांगून सदर विषय बंद करण्याच्या सूचना दिल्या.</td><td>जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर</td></tr>
<tr><td>१०</td><td>श्री. स्टॅलिन डी.<br>Reclamation of Wetlands by Thane Municipal Corporation</td><td rowspan="3">१) या तक्रारींबाबतचा लेखी अहवाल आणि मा. उच्च न्यायालयाचे आदेश (PIL 20637 /2018) दि.३१.०७.२०१८ रोजी ठाणे महानगरपालिका यांनी बैठकीत सादर केला.<br>• सद्यस्थितीत सदरची सर्व प्रकरणे न्याय प्रविष्ठ असून ठाणे महानगरपालिके तर्फे मा.उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार कारवाई करण्यात येईल असे ठाणे महानगरपालिकेच्या प्रतिनीधींनी बैठकीत सांगितले.<br>२) त्या अनुषंगाने समितीने सदर अहवाल आणि मा. उच्च न्यायालयात न्याय प्रविष्ठ असल्याचे आदेश स्वीकारुन सदर तक्रारी पुढील बैठकीतून बंद करण्याबाबच्या सूचना दिल्या.</td><td rowspan="3">ठाणे महानगरपालिका</td></tr>
<tr><td>११</td><td>टिप्पणीतील मुद्दा क्र. १२<br>Complaint No: KW13<br>श्री. राजीव दत्ता<br>Destruction of wetland mangroves at saket balkum road by TMC</td></tr>
<tr><td>१२</td><td>टिप्पणीतील मुद्दा क्र. १४<br>Complaint No: KW15<br>श्री. राजीव दत्ता. Illegal unauthorised dumping of building materials in the thane Creek opposite the thane COMM</td></tr>
<tr><td>१३</td><td>टिप्पणीतील मुद्दा क्र. ११<br>Complaint No: KW7<br>Wetland destruction<br>अज्ञात व्यक्ती गायमुख रेतीबंदर गांधी प्लॉट येथे भरणी</td><td>१) या तक्रारींबाबतचा लेखी अहवाल दि.३०.०७.२०१८ रोजी ठाणे महानगरपालिका यांनी बैठकीत सादर केला.<br>• सदर अहवालामध्ये ठाणे महानगरपालिकातर्फे दि. २८.०७.२०१८ रोजी पहाणी करण्यात आली. खाडी किनारी नजदीक भरणी सुरु असल्याचे आढळले असून जागेचे Latitude:19.289916, Latitude:72.9435 असून सदर जागा शासनाची असून तहसीलदार ठाणे यांना पर्यावरण संरक्षक कायदा कलम १५ व १९ अन्वये गुन्हा दाखल करण्याबाबत दि. ३०.०७.२०१८ रोजी पत्र देण्यात आलेले आहे.<br>२) समितीने या संदर्भात तहसिलदार ठाणे यांना स्थळ पहाणी</td><td>ठाणे महानगरपालिका<br>आणि<br>तहसीलदार, ठाणे</td></tr>
</table>

| | | | |
|---|---|---|---|
| | | करुन आवश्यक ती कार्यवाही करुन त्याबाबतचा अहवाल तात्काळ सादर करण्याच्या सुचना दिल्या. | |
| १४ | टिप्पणीतील मुद्दा क्र. १३<br>Complaint No: KW14<br>श्रीमती उल्का शुक्ला<br>Mass destruction via dumping of debris. | १) समितीने सिडको यांच्या प्रतिनिधींना या तक्रारी बाबत योग्य ती कार्यवाही करुन अहवाल पुढील बैठकीमध्ये सादर करण्याबाबत दि.२०.०६.२०१८ रोजीच्या बैठकीत सांगितले होते, परंतु अद्याप अहवाल प्रलंबित आहे.<br>२) त्या अनुषंगाने समितीच्या अध्यक्षांनी सिडको यांच्या प्रतिनीधींना या तक्रारीबाबत गांभीर्यपूर्वक विचार करुन आवश्यक ती कार्यवाही करण्याचे आदेश दिले व त्याबाबतचा अहवाल पुढील बैठकीत प्राधान्याने सादर करण्यास सांगितले. | सिडको आणि जिल्हाधिकारी रायगड |
| १५ | श्री. नंदकुमार पवार<br>Feedback on site visit of Uran taluka. 1) Dastan phata jasai, where almost 100 acres of wetland is reclaimed, Reclamation still continue. | सदर तक्रारीबाबत आवश्यक कार्यवाहीसाठी दोन्ही यंत्रणनेणे वेळ देण्याबाबत सांगितले.<br>त्यानुसार समितीने या तक्रारीबाबतचा अहवाल पुढील बैठकीमध्ये सादर करण्याबाबतच्या सूचना दिल्या आहेत. | सिडको आणि जिल्हाधिकारी रायगड |
| | 2) Coastal road - There are huge patches of mangroves have found dead either side of the coastal road by blocking of tidal water flow. | सदर तक्रारीबाबत आवश्यक कार्यवाहीसाठी दोन्ही यंत्रणनेणे वेळ देण्याबाबत सांगितले.<br>त्यानुसार समितीने या तक्रारीबाबतचा अहवाल पुढील बैठकीमध्ये सादर करण्याबाबतच्या सूचना दिल्या आहेत. | सिडको आणि जिल्हाधिकारी रायगड |
| | 3) At panja Dongri 289 hectares of mangroves stretch may be vanished due to blocking of tidal water flow by construction of concrete wall and installing of sluice gates.This stretch can be saved if, will to save, by restoration of tidal water flow. | सदर तक्रारीबाबत आवश्यक कार्यवाहीसाठी दोन्ही यंत्रणनेणे वेळ देण्याबाबत सांगितले.<br>त्यानुसार समितीने या तक्रारीबाबतचा अहवाल पुढील बैठकीमध्ये सादर करण्याबाबतच्या सूचना दिल्या आहेत. | सिडको आणि जिल्हाधिकारी रायगड |
| | 4) At terminal 4 of JNPT, 4550 mangroves trees (4.5 hectares) have killed needlessly. Forest department and tehsildar have confirmed the killing of mangroves. This site yet to be visited FIR must be filed against JNPT for killing of mangroves. | सदर तक्रारीबाबत आवश्यक कार्यवाहीसाठी दोन्ही यंत्रणनेणे वेळ देण्याबाबत सांगितले.<br>त्यानुसार समितीने या तक्रारीबाबतचा अहवाल पुढील बैठकीमध्ये सादर करण्याबाबतच्या सूचना दिल्या आहेत. | जिल्हाधिकारी रायगड |
| | 5) Reclamation on mangroves at Belpada by JNPT, for SEZ. | सदर तक्रारीबाबत आवश्यक कार्यवाहीसाठी दोन्ही यंत्रणनेणे वेळ देण्याबाबत सांगितले. | जिल्हाधिकारी रायगड |

| | | | |
|---|---|---|---|
| | Dumping continues in full swing. | त्यानुसार समितीने या तक्रारीबाबतचा अहवाल पुढील बैठकीमध्ये सादर करण्याबाबतच्या सूचना दिल्या आहेत. | |
| १६ | श्री. धिरज परब:- मीरा भाईंदर महापालिका हद्दीतील मीरारोड पश्चिम येथे नाझरेथ आगर परिसरात सरकारी व खाजगी जागेत कांदळवन पाणथळ चा ऱ्हास करून व सीआरझेड चे उल्लंघन. | १) या तक्रारी संदर्भात उप-आयुक्त मिरा-भाईंदर महानगरपालिका यांनी पत्र क्र. मनपा/अवि/२६६/२०१८-१९, दि.३१.०७.२०१८ रोजी या तक्रारी संदर्भात लेखी अहवाल समितीपुढे सादर केला.<br>• सदरच्या अहवालामधील माहिती ही नाझरेथ आगार या तक्रारी संदर्भात नसून अवर लेडी ऑफ नाझरेत चर्च मागील लालबहादूर शास्त्री नगर व नेहरु नगर या परिसरातील असल्याचे निदर्शनास आले.<br>२) त्या अनुषंगाने समितीने उप आयुक्त मिरा-भाईंदर महानगरपालिका यांना तक्रारीमध्ये नमूद केलेल्या जागेवर योग्य कार्यवाही करुन त्या बाबतचा अहवाल पुढील बैठकीपूर्वी सादर करण्याच्या सूचना दिल्या. | आयुक्त मिरा-भाईंदर महानगरपालिका |
| १७ | श्री. धिरज परब:- पालघर जिल्हयातील वसई तालुक्यात वरसावे पूल महामार्गापासून लोढा जैन मंदिर पर्यंतच्या परिसरात कांदळवन, पाणथळचा नाश करुन,सीआरझेड,इकोसेन्सेटिव्ह झोनमध्ये चाललेल्या प्रचंड भराव-बांधकामा प्रकरणी. | १) या तक्रारी संदर्भात जागेचा सर्वे करण्याचे आदेश निर्गमीत झाले असून सदर जागेत पाणथळ जागा CRZ मध्ये आहे किंवा कसे याबाबत कार्यवाही करावयाची आहे असे तहसिलदार वसई जि. पालघर यांनी सांगितले.<br>२) त्या अनुषंगाने समितीने तहसिलदार वसई यांना योग्यरित्या स्थळ पहाणी करुन पुढील कार्यवाही करण्यास व त्या बाबतचा अहवाल पुढील बैठकीमध्ये सादर करण्याबाबत सांगितले. | जिल्हाधिकारी पालघर |
| १८ | श्री. धिरज परब: - वरसावे, चेणे, काशी, घोडबंदर, मिरे या संजय गांधी राष्ट्रीय उद्यानालगतच्या इको सेन्सेटिव्ह झोन मधील बेकायदा भराव, बांधकामे तातडीने थांबवून निष्कासित करणे बाबत. | • सदरची तक्रार ही संजय गांधी राष्ट्रीय उद्यानालगतच्या Eco-sensetive Zone चे उल्लंघन असल्याने समितीने ही तक्रार Eco-sensetive Zone Monitoring Committee यांना हस्तांतर करण्याच्या सूचना दिल्या आहेत. | ठाणे महानगरपालिका |
| १९ | श्री.धिरज परब :- भाईंदरच्या उत्तन येथील एस्सेल ग्रुपने (पॅन इंडिय) कटकारस्थान करून कांदळवनाची प्रचंड तोड व बांध घालून पर्यावरणाचा ऱ्हास केल्याबाबतची तक्रार | १) या तक्रारी संदर्भात जिल्हाधिकारी ठाणे यांनी ही तक्रार जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांच्या अंतर्गत येत असल्याचे सांगितले.परंतु तक्रारदार यांनी या तक्रारीबाबत जिल्हाधिकारी ठाणे आणि उप विभागीय अधिकारी यांच्यामार्फत स्थळ पहाणी झाली असे सांगितले.<br>• तसचे उत्तन सागरी पोलीस ठाण्यात दि.१३.१२.२०१३ रोजी गुन्हा नोंद क्र. ५/२०१३ व दि.१७.११.२०१५ रोजी ३/३०१५रोजी असे २ FIR दाखल एस्सेल इन्फ्राचे मालक यांच्या वर गुन्हा दाखल करण्यात आला आहे असे तक्रारदाराने नमूद केले आहे.<br>२) समितीने सदर तक्रारीबाबत पुन्हा तपासणी करुन | जिल्हाधिकारी मुंबई उपनगर<br>आणि<br>जिल्हाधिकारी ठाणे |

| | | | |
|---|---|---|---|
| | | त्याबाबतचा अहवाल पुढील बैठकीत सादर करण्यास जिल्हाधिकारी ठाणे यांना सांगितले. | |
| २० | श्री.धिरज परब: - ३ मीटर पायवाट असल्याची खोटी माहिती देऊन १८ मीटर रस्ता मंजुरी मागत शासनाची फसवणूक व दिशाभूल केले बाबत. | १) या तक्रारी संदर्भात मिरा-भाईंदार महानगरपालिकेने त्यांचे पत्र क्र. मिभा/मनपा/नर/३०७०/२०१८-१९, दि.३१/०७/२०१८ रोजीचा अहवाल समितीच्या समोर सादर केला.<br>• सदर अहवालामध्ये प्रस्तावित विकास योजना रस्ता हा मिरा भाईंदर महानगरपालिका मंजूर CZMP नकाशानुसार सी.आर.झेड. ने बाधीत होत आहे. भाईंदर पश्चिम परिसरातील शास्त्रीनगर, नेहरुनगर, गणेशदेवले नगर, क्रांतीनगर हे नागरी वस्तीचे भाग हे तत्कालीन नगरपरिषद कालावधीपासून अस्तित्वात असून सदर भागास सदयस्थितीत दळणवळण व येजाकरण्याकरिता आवश्यक मोठया रुंदीचा रस्ता उपलब्ध नसल्याने उपरोक्त जागेकरिता मिरा भाईंदर महानगरपालिकेने विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुन महाराष्ट प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) चा प्रस्ताव शासनाकडे मंजुरी करिता सादर केलेला आहे. भविष्यात फेरबदलास शासनाची मंजुरी प्राप्त झाल्यास उक्त रस्ता बनविण्यापुर्वी सी.आर.झेड च्या दृष्टीकोनातून शासनाने पर्यावरण विभागाकडील नाहरकत दाखला प्राप्त झाल्यानंतरच कायदेशीर बार्बीच्या पुर्ततेनंतर सदरचा रस्ता महानगरपालिकेमार्फत विकसीत करणेत येणार आहे असे सांगितले.<br>• सबब वरील वस्तुस्थिती पाहता संबंधीत तक्रारदाराने ३.० मी पायवाट असल्याची खोटी माहिती देऊन १८.०० मी रस्ता मंजुरी मागत शासनाची फसवणुक व दिशाभुल केल्याबाबत त्यांचे म्हणणे संयुक्तीक वाटत नाही असे सांगितले.<br>२) समितीने सदर अहवालानुसार या जागेवर कोणत्याही प्रकारचे उल्लघन झाल्याचे दिसून येत नसल्याने सदर तक्रार ही खोटी असल्याचे दिसून येते व सदर जागेवर कोणताही पाणथळ ऱ्हास झाल्याचे दिसून येत नसल्याचे ही तक्रार पुढील बैठकीपासून बंद करण्याच्या सूचना दिल्या आहेत.<br>३) तक्रारदार श्री.धिरज परब यांच्याकडून मिरा-भाईंदार महानगरपालिके संदर्भात खूप तक्रारी येत असून काही तक्रारी चूकीच्या तक्रारी वारंवार येत असून या तक्रारींमध्ये कोणतेही तथ्य दिसून येत नाही असे समितीच्या निदर्शनास आले, अशा प्रकारच्या चुकीच्या तक्रारी वारंवार येत असल्यास ते मा.उच्च न्यायालायाच्या निदर्शनास आणले जाईल असा समितीने निर्णय घेतला. | आयुक्त – मिरा भाईंदर महानगरपालिका आणि जिल्हाधिकारी, ठाणे |
| २१ | श्री. धिरज परब :- आमदार नरेंद्र मेहता यांनी सत्ता व पदाचा | १) या तक्रारीबाबत उप-आयुक्त मिरा-भाईंदर महानगरपालिका यांनी त्यांचा अहवाल पत्र क्र. जा.क्र. | आयुक्त मिरा-भाईंदर महानगरपालिका आणि |

| | | | |
|---|---|---|---|
| | दुरुपयोग करून महापालिका आदींच्या संगनमताने पर्यावरणाचा केलेला ऱ्हास ७११ क्लब | मिभा/मनपा/नर/३०७०/२०१८-१९, दि. ३१/०७/२०१८ रोजी समितीपुढे सादर केला.<br>२) समितीने उप आयुक्त मिराभाईंदर यांना या तक्रारीबाबत सादर केलेल्या अहवालामधील सर्व कागदपत्रे आणि CRZ नकाशे पुढील बैठकीत सादर करण्याच्या सूचना दिल्या. | जिल्हाधिकारी, ठाणे |
| २२ | श्री.मॅकेन्झी डांबरे:- वसई-विरार परिसरातील मानव निर्मित पूरपरिस्थती व वसई येथील पाणथळ जागेवरील अतिक्रमणाबाबत. | सदर तक्रारीबाबत वसई विरार महानगरपालिकेने योग्य ती कार्यवाही करुन त्याबाबतचा अहवाल पुढील बैठकीत सादर करण्यास सांगितले. | आयुक्त - वसई विरार महानगरपालिका आणि जिल्हाधिकारी, पालघर |
| २३ | श्री. राजीव दत्ता KW53:- Destruction of mangroves &Wetland by hiranandani builders, Thane. | सदर तक्रारीबाबत ठाणे महानगरपालिकेने श्रीमती श्वेता भट यांची तक्रार व सदर तक्रार एकसारखी असल्याचे समितीच्या निदर्शनास आणून दिले. त्या अनुषंगाने समितीने या तक्रारीबाबत श्वेता भट यांच्या तक्रारी प्रमाणेच (इतिवृत्तातील मुद्दा क्र.३) कार्यवाही करण्यास सांगितले. | ठाणे महानगरपालिका आणि जिल्हाधिकारी, ठाणे |
| २४ | श्री.राजीव दत्ता KW72:- Destruction of wetlands & mangroves for personal gains. Bhiwandi, Thane. | सदर तक्रारीबाबत ठाणे महानगरपालिकेला योग्य ती कार्यवाही करण्याबाबत समितीने सांगितले. | ठाणे महानगरपालिका आणि जिल्हाधिकारी, ठाणे |

सदर सभेत उपस्थित असलेल्या सभासदांचे आभार मानून बैठक संपल्याचे सचिवांकडून जाहिर करण्यात आले.

अध्यक्ष
कोकण पाणथळ तक्रार निवारण समिती
तथा
विभागीय आयुक्त कोकण विभाग.